गुन्हेगारी-घटनेस वाचा फोडुन झुंज देणारे एकमेव दैनिक

# दैनिक झुंजार जनता

R.N.I. No.MAHMAR/2022/82590 Mo. 8180068180

* औरंगाबाद / महाराष्ट्र | वर्ष : ३ | मंगळवार दि.२९/१०/२०२४ | अंक ३७ | पाने ४ | किमत ४ रु

।।सुविचार।।

माणसाला स्वतः ची जबाबदारीची जाणीव झाली की सर्वी हौस विसरावी लागते राव

## हदगाव विधानसभेसाठी सोमवारी २५ उमेदवारांनी ३१ उमेदवारी अर्ज दाखल

### आज १७ व्यक्तींनी केली २२ अर्जाची उचल

**हदगाव प्रतिनिधी :-** हदगाव विधानसभा निवडणुकीसाठी आज ३१ उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले आहेत उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्यान मध्ये विजयकुमार सोपानराव भरणे अपक्ष, ॲड. रामदास शिवराम अपक्ष, बाबुराव विश्वनाथराव मुनेश्वर अपक्ष,शेख जाकीर शेख महंमद चाऊस रिपब्लिकन सेना ,अब्दुल समदखान हाजी जलालखान अपक्ष, वैशाली मारोतराव हुके पाटील अपक्ष ,डॉ.रेखा दत्तात्रय चव्हाण अपक्ष, ॲड.मारोतराव कानोबाराव हूके पाटील अपक्ष,विश्वनाथ भाऊराव फाळेगावकर अपक्ष,निळकंठ मुकुंदराव कल्याणकर अपक्ष, रमेश माधवराव नरवाडे अपक्ष, गणपत प्रकाशराव पवार अपक्ष ,करण उत्तमराव गायकवाड अपक्ष, उत्तम गायकवाड अपक्ष, प्रकाश रामा घुन्नर अपक्ष, सुभाष मारोतराव जाधव अपक्ष,दिलीप आला राठोड वंचित बहुजन आघाडी, बालाजी भगवान पऊळ अपक्ष,अन्वरखान नुरुद्दीखान अपक्ष ,श्रीनिवास वैजनाथ पोतदार अपक्ष,संभाराव उर्फ बाबुराव गुणाजीराव कदम शिवसेना शिंदे गट,नेहा माधवराव पवार भा. रा. काँग्रेस,माधवराव निवृत्तीराव पवार भा.रा. काँग्रेस,दिनेश विजय श्रीरामज्वार अपक्ष, अशोक पांडुरंग राठोड अपक्ष,अनिल दिगंबर अपक्ष.आज १७ व्यक्तींनी २२ अर्जाची उचल केली आहे तसेच आज २७ व्यक्तिनी कडून २ लाख ३५ हजार रुपये अनामत रक्कम प्राप्त झाली असून आजपर्यत ३३ जनांनी ४० नामनिर्देशनपत्र दाखल केले आहेत तर आत्तापर्यत १२९ व्यक्तींनी २२० अर्जाची अचल केली असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी अविनाश कांबळे,सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती नांदे,सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती पल्लवी टेमकर मिडिया कक्षातून ए.एम.तामसकर अनिल दस्तूरकर यांनी कळविले आहे.

## शिवसेनेच्या तिसऱ्या यादीत मोठा ट्विस्ट; भाजपच्या हायप्रोफाईल उमेदवाराला ठाकरेंविरोधात तिकीट दिले नाही



**मुंबई:-** विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेना शिंदे पक्षाची तिसरी यादी जाहीर झाली आहे. शिवसेनेच्या तिसऱ्या यादीत मोठा ट्विस्ट पहायला मिळत आहे. आदित्य ठाकरेंविरोधात निवडणूक लढण्याच्या तयारीत असलेल्या भाजप हायप्रोफाईल उमेदवार अशी चर्चा असलेल्या शायना एनसी शिवसनेने उमेदवारी दिली आहे. तिसऱ्या यादीत शिवसेनेने १५ उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. शिवसेनेच्या तिसऱ्या यादीत सुजय विखे यांचा पत्ता कट शिवसेनेच्या तिसऱ्या यादीत कन्नड मधून रावसाहेब दानवे यांची कन्या संजना जाधव यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. संगमनेर मधून अमोल खताळ यांना उमेदवारी जाहीर केली. याचा अर्थ संगमनेर मधून विखे पाटील यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता पूर्णपणे संपली आहे. हातकणंगले आणि शिरोळ हे दोन मतदार संघ मित्र पक्षांना सोडण्यात आले आहेत. या मतदार यादीत धारावीच्या उमेदवाराचा उल्लेख नाही. धारावी मधून समीर वानखेडे एकदा शिंदे यांचे उमेदवार होतील अशी शक्यता होती. मात्र, धारावी हा मतदारसंघ रामदास आठवले यांच्या आरपीआय या देण्यात येणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे समीर वानखेडे आरपीआयमध्ये प्रवेश करून त्या मतदारसंघातून निवडणूक लढतील अशी शक्यता आहे. मीरा-भाईंदर मधून शिंदे समर्थक अपक्ष आमदार घेता जैन यांच्या नावाचा उल्लेख नाही.शायना एनसी यांना मुंबादेवी मधून उमेदवारी देण्यात आली. या मतदारसंघातून भाजपाचे माजी आमदार आणि माजी नगरसेवक अतुल शहा आणि माजी राज के पुरोहित हे दोघेही इच्छुक होते. वरळी मतदार संघात आदित्य ठाकरे यांच्या विरोधात संदीप देशपांडे वरळीतून मैदानात उतरले आहेत. तर, भाजप नेत्या शायना एन सी शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हावर लढणार असल्याची चर्चा होती. मात्र, शायना एन सी ऐवजी शिवसेनेनं मिलिंद देवरा यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

## सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांची रब्बी हंगामाची तयारी मशागतीच्या कामाला लागला बळीराजा

**सोयगाव तालुका..**
**प्रतिनिधी दिलीप मोरे..**

सोयगाव तालुक्यात व परिसरात सोयाबीनची काढणी जवळपास पूर्ण होत आली आहे. सोयगाव तालुक्यात शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील पेरणीसाठी आवश्यक मशागतीच्या कामाला वेग दिला आहे. निंदण, हरभरा पेरणीसाठी शेतकरी तयारी करीत आहेत. यंदाच्या पावसाळ्यात जिल्ह्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्याने विहिरी, शेततळे, प्रकल्प झाले. आता खरीप हंगामातील सोयाबीन काढणी अंतीम टप्प्यात आहे. त्यामुळे सोयगाव तालुक्यात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील पेरणीसाठी शेतीच्या मशागतीची कामांना वेग दिला आहे. यंदा तालुक्यातील प्रकल्प, विहिरींमध्ये मुबलक जलसाठा असल्याने रब्बी हंगामात पेरणीचे क्षेत्र वाढण्याचा अंदाज कषी विभागाने वर्तविला आह कृषी विभागाकडून तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी चांगल्या वानाचे हरभरा बियाणे उपलब्ध करून देण्यात आले आहे दरवर्षी रब्बी हंगामात गहू व हरभऱ्याचे क्षेत्र सर्वाधिक असते. यंदाही गहू व हरभऱ्याची सर्वाधिक पेरणी होण्याचा



अंदाज आहे. सोयगाव तालुक्यात अनेक ठिकाणी तुरीच्या पिकांत आंतरपीक म्हणून हरभऱ्याच्या पेरणीला अनेक शेतकऱ्यांनी सुरुवातही केल्याचे दिसून येत आहे. शेतकरी हरभरा पेरणी करु लागले असले तरी यंदा तालुक्यात क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता आहे.

**************************

## निराधारांना नविन ज्योत महिला मंडळ चा आधार... जीवनावश्यक वस्तू सह चोळीचा आहेर..

संतोष डवरे,हदगाव:- आपण ज्या समाजात जगतो, लहानाचे मोठे होतो त्याचं समाजाची एक बांधिलकी म्हणून त्याप्रती कृतज्ञता भावनेने काही तरी देणे लागते म्हणून त्यांची थोड्याफार प्रमाणात का होईना परतफेड करावी, आपल्या मनाला एक आत्मिक समाधान लाभेल असे काही तरी सामाजिक जाणिवेतून विविध प्रकारचे उपक्रम राबून सामाजिक कार्य करणारे येथील जवळपास दहा वर्षापासुन निराधार गरजु लोकांना आधार देण्याचे काम करणारे नविन ज्योत सेवाभावी महिला मंडळ नांदेड यांच्या वतीने नियमित चालु आहे. दीपावलीच्या आनंददायी वातावरणात समाजातील निराधार व्यक्तींना विविध साहित्य व जीवनावश्यक वस्तू देत एक सामाजिक उपक्रम राबवण्यात आला तालुक्यातील मौजे कुसळवाडी येथील काही निराधार व्यक्तींना व गरजु महिलांना निमित्त साडीचोळी,राशन किट आणि मिस्टांनाचे पदार्थ देण्यात आले.या

**"जे का रंजले गांजले ,त्याशी म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा देव तेथेची जाणावा, या म्हणी प्रमाणे**
नविन ज्योत महिला मंडळ ,नांदेड चा सामाजिक उपक्रम समाजात एक नवा आदर्श निर्माण करत असल्याचे मत सरपंच श्रीरंग देशमुखे यांनी व्यक्त केले आहे".

सेवाभावी महिला मंडळ नांदेड च्या वतीने सौ.निलावती हरबळकर , सौ.शैलजा झेंडे ,अनुसया शहाणे, दिपाली रायेवार, स्नेहल वसमते , अनुसया भारती ,धनश्री वाघमारे ,अश्विनी गिरी, उषाताई गैनवाड ,सुवर्णा नोमुलवार, उषाबाई भेंडे, नेहा नोमुलवार, ऋतुजा गिरी व पवार सर आदींनी पुढाकार घेऊन हा यशस्वी केला. यावेळी गरजु निराधार गावातील महिला रुख्मीनीबाई मेटकर,गंगाबाई भुरके,हरनाबाई चिभडे,राधाबाई रांजणे,गिरजाबाई धनवे,अनुसया गोदमले,कोंडाबाई भुरके आदींचा सन्मान नविन ज्योत महीला मंडळाच्या वतीने करण्यात आला.यावेळी उपस्थित मा.सरपंच पार्वतीबाई डुकरे,मा. सरपंच हर्णाबाई वानोळे ग्रामपंचायत सदस्य इंद्राबाई भुरके,लक्ष्मी देशमुखे, मंगल देशमुखे, भाग्यरथा डवरे,पार्वती देशमुखे,चंद्रभागा भुरके,लताबाई चिभडे,सरस्वती भिसे,सुमनबाई देशमुखे, सोनाबाई डुकरे,सयाबाई भुरके,संगीता डुकरे,निलाबाई भुरके, भुरके,सरस्वती भुरके,धुरपता डुकरे,सुशिला देशमुखे,लक्ष्मी भुरके,अनुसया धनवे,पार्वतीबाइ बोंबले, रुख्मीनीबाई ढोले,वर्षा डुकरे,भारजाबाई डुकरे,ललिताबाई मेटकर,सयाबाई वागतकर,सुमनबाई खुडे,श्रीपती देशमुखे, काशिबा डुकरे,कामाजी डुकरे,सखाराम



भुरके,महादु डुकरे, बाबुशराव देशमुखे, पांडुरंग ढोले,सिताराम भुरके, पांडुरंग डुकरे,भागोराव रांजणे,हरी भुरके, नारायण भुरके,पांडुरंग बोंबले,संतोष डुकरे,संजय डुकरे,भुजाजी डुकरे,संजय डुकरे,होते या कार्यक्रम नियोजनामध्ये विशेष सहकार्य संतोष डवरे सर यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी प्रसराम मेटकर, वैभव भिसे,परमेश्वर डुकरे,भिमराव देशमुखे, मारोती भिसे, पोलीस पाटील हरीष बोंबले यांनी परिश्रम घेतले.

## तुमच्या सर्व सामान्य मायबाप जनतेच्या आशिर्वादाने विजय आपलाच होणार..





**गंगापूर प्रतिनिधी : हारुण पठाण**

गंगापूर विधानसभा-११२ २०२४ चे अधिकृत उमेदवार म्हणुन कार्यसम्राट आमदार रमेश बोरनारे यांनी शिवसेना पक्षाच्या वतीने आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी माजी आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगावकर, मा नगराध्यक्ष साबेरभाई, भाजप सरचिटणीस दशरथ बनकर, डॉ राजीव डोंगरे, माजी तालुकाध्यक्ष खुशालसिंह राजपूत, ज्ञानेश्वर जगताप, भाजप तालुकाध्यक्ष नारायण पा कवडे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष विजय पा अनिल चव्हाण, बाळू चव्हाण, सुनिल पोळ, महेंद्र गंडे, विजू काकडे, अनिल राजगिरे, नाजईम पठाण, जाफ्रर पठाण, सतिष हिवाळे, बद्रीनाथ चव्हाण, यादी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## जोरदार शक्तिप्रदर्श करत आमदार सतीश चव्हाण यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**फगंगापूर I प्रतिनिधी : हारुण पठाण**

गंगापूर विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार आमदार सतीश चव्हाण यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. गंगापूर शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन रॅलीला सुरुवात झाली. या रॅलीत गंगापूर व खुलताबाद तालुक्यातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी, असंख्य कार्यकर्ते, सामान्य नागरीक व महिलांचा उत्स्फूर्त सहभाग होता. शिस्तबद्ध व शांततेत निघालेल्या या रॅलीत आ.सतीश चव्हाण यांनी शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज या महापुरुषांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. रॅली दरम्यान जवळपास पाच-सहा किलोमीटर गंगापूर शहरातील मुख्य रस्त्यावर मोठी गर्दी होती. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी केलेले हे शक्तिप्रदर्शन पाहून आज प्रत्यक्ष दर्शीना गंगापूर मतदारसंघात परिवर्तन अटळ आहे, अशी चर्चा रॅलीला मिळालेला प्रतिसाद पाहून स्पष्टपणे जाणवत होता. उमेदवारी अर्ज पहिल्यांदाच इतकी मोठी गर्दी जमा झाल्याचे लोकं बोलत होते, अशी विक्रमी गर्दी होणे हे आ.सतीश चव्हाण यांच्यासाठी अश्वासक वातावरण निर्माण झाल्याचे सिद्ध करते. या गर्दीने विरोधकांसमोर मोठे आव्हान निर्माण केले आहे, हे ठळकपणे जाणवत होते. राष्ट्रवादी, शिवसेना, काँग्रेस या पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाले होते. रॅली पाहण्यासाठी शहरातील नागरिकांनी मोठी गर्दी रस्त्यावर केली होती. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी मंत्री राजेश टोपे, जेष्ठ नेते सुधाकर सोनवणे, काँग्रेसचे जेष्ठ नेते जगन्नाथ खोसरे, उपजिल्हा प्रमुख लक्ष्मणभाऊ सांगळे, त्रिंबक तुपे, डॉ. नरेंद्र काळे, पांडुरंग तांगडे पाटील, संजय जाधव, राजू वरकड, दिनेश मुथा, अंकुश काळवणे, अनिल चव्हाण, संपत छाजेड, अनिल




जाधव, जैस्वाल, विश्वजीत चव्हाण, आयुब पटेल, जनार्धन रोडगे, महेश उबाळे, रमेश निचित, अर्चना सोमासे, मच्छिंद्र देवकर, राजू पाटील डोणगावकर, मोहसीन चाऊस, एस एस खमर, नासेर पटेल, रावसाहेब तोगे, प्रवीण नीतनवरे, नितीन कांगुने, मारोती साळवे, लक्ष्मण पाटील प्रधान, अशोक गायकवाड, राजू पठाण, अनिता बोरसे, गजानन फुलारे, विमलबाई जगताप, योगेश पाटील, सुरेश आयुब पटेल, तुकाराम सटाले, सोपान देशमुख, नदीम शेख, वाजेद शेख आदींसह राष्ट्रवादी, शिवसेना, काँग्रेस व महाविकास आघाडीतील मित्र पक्षाचे कार्यकर्ते आदींची उपस्थिती होती...

************************

## डॉ सुरेश सोनवणे यांनी गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघासाठी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

**गंगापूर I प्रतिनिधी : हारुण पठाण**

डॉ सुरेश सोनवणे यांनी गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दिनांक २८ रोजी दाखल केला असून यावेळी मोठ्या संख्येने डॉ सोनवणे समर्थक उपस्थित होते.

गंगापूर खुलताबाद विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज दाखल करणे सुरू असून दि २८ रोजी डॉ. सुरेश सोनवणे यांनी आपला अपक्ष उमेदवार अर्ज दाखल केला मागील सलग पंधरा वर्ष,सतरा वर्ष आमदार म्हणून जनतेने ज्यांच्यावर ठेवला त्यांनी जनतेचा विश्वासघात केलाच परंतु सामान्य जनतेच्या डोळ्यातील विकासाऐवजी ऐवजी मिरचीचा भुकटा फेकुन जनतेच्या डोळ्यात अश्रू आणण्याचे काम केले आहे या राजकारण्यांना यावेळी सुज्ञ जनता घरी बसवेल याची मला खात्री आहे. आपले राजकीय वर्चस्व टिकवण्यासाठी तालुक्यात ठराविक बागात व ठराविक प्रश्नांवरतीच काम करण्यात आले. एमआयडीसीच्या माध्यमातून तरुणांना रोजगार करणे, कंपनी कारखानदार उद्योजक यांना संरक्षण मिळवून देणे, एमआयडीसीतील मूलभूत प्रश्न यासह ग्रामीण भागातील शालेय शिक्षणाचा दर्जा उंचावणे विद्यार्थ्यांना परीक्षाभिमुख व स्पर्धात्मक शिक्षण उपलब्ध करून देणे सरकारी नोकरदार शिक्षक यांचे प्रश्न,शेतकऱ्यांचे प्रश्न यासह पाणी आरोग्य रस्ते या




मूलभूत प्रश्नांना नजरेसमोर ठेवून ही प्रश्न पुढील पाच वर्षांमध्ये मार्गी लावण्यासाठी पुढील वर्ष मायबाप जनतेने आशीर्वाद रुपी माझ्यावर विश्वास ठेवावा या धनाढ्य व भ्रष्टाचारी राजकारण्यांना आपली पोळी भाजण्याची व जनतेचा विश्वासघात करण्याची जणूकाही सवय झाली आहे जनतेच्या मनातील विकास व्हावा तसेच मी या धनशक्तीच्या विरोधात जनशक्तीचा नारा देत मतदार राजाने भूमिपुत्रावर विश्वास दाखवा व मला ही संधी द्यावी दृष्टिकोनातून मी हा अर्ज दाखल केला असून पुढील काळामध्ये प्रचार दरम्यान मुख्य अजेंडा हाती घेऊन त्यावरती काम केले जाईल. तसेच निवडणुका ह्या पैशाच्या बळावर किंवा जातीपातीचे राजकारण न करता ग्रामीण भागातील युवक शेतकरी उद्योजक वर्गांना केंद्रस्थानी ठेवून पूर्ण ताकदीनिशी लढवणार असल्याचे देखील यावेळी अपक्ष उमेदवार डॉक्टर सोनवणे यांनी सांगितले.







## हदगाव विधानसभेत ॲड.रामदास यांचा अपक्ष म्हणून अर्ज सादर...



नांदेड जिल्हा प्रतिनिधी :- हदगाव विधानसभा निवडणुकीसाठी सामाजिक कार्यात नेहमीच सक्रिय असणारे, उच्च विद्याविभूषित विधीतज्ञ म्हणून प्रसिद्ध असणारे ॲड. रामदास डवरे यांनी आपल्या असंख्य समर्थकासह अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. हदगाव हिमायतनगर मतदार संघात ॲड. डवरे यांची सामाजिक पकड घट्ट असल्याने समाजातील लोकांच्या हक्क व अधिकार यांच्यासाठी न्यायालयाच्या माध्यमातून तसेच विविध सामाजिक जाणीवेतून वेगवेगळे सामाजिक कार्यक्रमातून ॲड. डवरे यांनी आपल्या कार्याचा एक वेगळा ठसा उमटवला आहे. खास लोकांच्या आग्रहाखातर विधानसभेच्या निवडणुकीत उतरण्यासाठी आपण प्रेरित होऊन अर्ज दाखल केला आहे. त्याचं बरोबर या विधान सभा क्षेत्रातील घराणेशाहीला सर्व सामान्य जनता कंटाळून गेली येथे नक्कीच बदल दिसून येईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. यावेळी श्री.दत्तात्रय वाळके, सखाराम वाकोडे,, माणिकराव डवरे, मनोहर मुरमुरे, पुरभाजी तांबारे,किशोर सरकुंडे, ज्ञानेश्वर तायवाडे, सटवाजी नखाते, सुभाष गारोळे ,अवधूत भिसे ,संजय गारोळे ,विठ्ठल धुमाळे, बबन वाकोडे, माधव मिरासे ,श्रीरंग देशमुखे ,बालाजी खांदोडे ,बालाजी माव्होरे, मनोहर माहोरे गोविंद वानोळे नाव्हेकर, गणेश डवरे अँड. जाधव,अँड. ढोले, अँड. नरवाडे,अँड. देवकर आदीसह हजारो कार्यकर्ते ,मतदार उपस्थित होते.

## शिवाजी जाधव यांचे दुःखद निधन



कन्नड जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य व जिजामाता विद्यालय पिंपरखेडा येथील सेवानिवृत्त शिक्षक शिवाजी काशिनाथराव जाधव यांचे अल्पशा आजाराने दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता दुःखद निधन त्यांचा अंत्यविधी पिशोर येथील स्मशानभूमी येथे झाला. त्यांच्या पश्चात पत्नी तीन मुले नातवंड परिवार आहे. धर्मवीर संभाजी कर्मचारी शिक्षक पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष होते. जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव यांचे काका व सतीश जाधव पोलीस निरीक्षक (अंबड जि. जालना )यांचे वडील होत.

# मतदार जनजागृती निमित्त किनवटमध्ये युवा संसद ,संकल्प पत्र व मतदार शपथ कार्यक्रम

**संतोष डवरे, नांदेड :** - विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४च्या अनुषंगाने जनजागृतीसाठी नांदेड जिल्ह्यातील किनवट येथील सरस्वती विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात युवा संसद,संकल्प पत्र व मतदार शपथ कार्यक्रम घेण्यात आला. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत राऊत , जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा स्वीपच्या नोडल अधिकारी मीनल करणवाल यांच्या संकल्पनेतील मतदार जनजागृती (स्वीप) अंतर्गतचे उपक्रम जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कावली मेघना यांच्या मार्गदर्शनाखाली गट शिक्षणाधिकारी तथा स्वीप कक्ष प्रमुख गंगाधर राठोड हे आपल्या सहकाऱ्यांसह ८३-किनवट विधान सभा मतदार संघात राबवित आहेत. या अनुषंगाने येथील सरस्वती वद्यामंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विविध उपक्रम राबविण्यात आले. नव मतदारांचा युवा संसद कार्यक्रम घेण्यात आला. स्वागत करण्यात आले. सर्वांनी आपल्या आई-वडिलांना, काका-काकू, दादा-वहिनी, आदिंना मी मतदान करणारच असे भावनिक करणारे पत्र लिहून घेण्याचे आवाहन करण्यात आले. शिक्षकांसह सर्व नवमतदार युवक युवतींना मतदान शपथ दिली.याप्रसंगी कार्यक्रमाध्यक्ष प्राचार्य कृष्णकुमार नेम्माणीवार, स्वीप कक्षाचे सर्व सदस्य रमेश मुनेश्वर , शेषेराव पाटील, सुरेश पाटील व प्रा. डॉ. सुनिल व्यवहारे होते. प्रारंभी मान्यवरांचा ग्रंथ देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन स्वीप कक्षाचे सदस्य डॉ. मार्तंड कुलकर्णी यांनी केले. स्वीप कक्षाचे सदस्य तथा नयाकॅम्प किनवटचे केंद्र प्रमुख उत्तम कानिंदे संकल्प पत्र लेखनाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की, जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीच्या प्रगल्भतेसाठी मुलांनी आपापल्या घरी जाऊन मातृभाषेत आई-वडिलांना मतदान केंद्रात जाऊन मतदान करण्याविषयी संकल्प पत्र लिहावे , मतदान करणे महत्त्वाचे आहे हा विचार सांगावा. यावेळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील



सर्व शिक्षक ,शिक्षिका मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. पर्यवेक्षक प्रा. रेणुकादास पहुरकर यांनी आभार मानले.

*********************

# या' एका जागेवरुन आघाडी तुटणार?

## छोट्या पक्षांनी मोठ्या पक्षांविरोधात उभारलं बंडाचं निशाण

उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी एकच दिवस असताना महाविकास आघाडीत गोंधळात गोंधळ पाहायला मिळतोय. छोट्या पक्षांना अतिशय कमी जागा दिल्यानं आपापल्या प्रभावक्षेत्रातील जागांवर मित्रांनाच आव्हान दिलंय. एवढंच नाहीतर भूम परांडा आणि सोलापूर दक्षिण जागेवरुन महाविकास आघाडीचे दोन दोन उमेदवार रिंगणात उतरलेत. त्यामुळं महाविकास आघाडीत महाबिघाडी होण्याची चिन्हं आहेत. उमेदवारी अर्ज भरायला केवळ दोन दिवस शिल्लक असताना मविआचे २० मतदारसंघातील उमेदवार जाहीर व्हायचे बाकी आहेत. काही जागांवर मित्र पक्षांमध्ये तिढा काही जागांवर एकापेक्षा जास्त इच्छुक उमेदवार असल्यानं उमेदवार निश्चित होऊ शकले नाहीत. महाविकास आघाडीत जागावाटपात गोंधळात गोंधळ पाहायला मिळतोय. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी एकच दिवस उरलेला असताना महाविकास आघाडीच्या अनेक जागांवर दोन-दोन पक्षांच्या उमेदवारांनी अर्ज दाखल केलेत. किंवा मित्रपक्षांनी एकापेक्षा जास्त एबी फॉर्म दिलेत. त्यामुळं महाविकास आघाडीत गोंधळात गोंधळ मिळतोय. महाविकास आघाडीतील छोट्या पक्षांनी मोठ्या पक्षांविरोधात बंडाचं निशाण उभारलंय. भाकपला शिरपूरची जागा सोडलीय. भाकपनं वणी, भिवंडी पश्चिम, संभाजीनगर मध्य, हिंगणा आणि विक्रमगडवर दावा केलाय. माकपला २ जागा सोडण्यात आल्यात. माकपनं सोलापूर मध्य आणि नाशिक पश्चिम मतदारसंघावर दावा केलाय. सपाला भिवंडी पूर्व शिवाजीनगर-मानखुर्द मतदारसंघ देण्यात आलेत. सपानं मालेगाव मध्य, पश्चिम आणि धुळे मतदारसंघावर दावा केलाय. शेकापला अलिबाग आणि श्रीवर्धन मतदारसंघ सोडण्यात आलाय. शेकापनं सांगोला, अलिबाग, उरण, पेण या मतदारसंघावर दावा ठोकलाय. हे झालं छोट्या पक्षाचं, महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि काँग्रेसमध्येही जुंपल्याचं पाहायला मिळतंय. या जागेवरुन महाविकास आघाडीता वा सोलापूर दक्षिणमध्ये शिवसेना णइढनं रवी रतिकांत यांना उमेदवारी दिलीय. तरीही काँग्रेसनं दिलीप मानेंची उमेदवारी जाहीर केलीय. भूम-परांडा मतदारसंघात शिवसेना णइढनं रणजित पाटील यांना उमेदवारी दिलीय. राष्ट्रवादी ङझनं राहुल मोटेंसाठी



आग्रह धरलाय. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं सोलापूर दक्षिणवर ठाम असल्याचं सांतिलंय. काँग्रेसच्या हक्काच्या जागांवरचा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं सोडावा अशी भूमिका नाना पटोलेंनी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवसांपर्यंत एकमेकांची नाराजी दूर करण्याचा अवधी मविआला मिळणार आहे. त्यानंतर मात्र बंडखोरांना आवरण्यासाठी किंवा मैत्रीपूर्ण लढतींची तयारी प्रस्थापितांना करावी लागणार हे निश्चित...

***************

# महाराष्ट्राच्या राजकारणात सुरु झालाय विचित्र ट्रेंड! निवडणूक जिंकण्यासाठी उमेदवारांची तात्पुरती व्यवस्था

महायुतीनं जागावाटपात आघाडी घेतलीय. भाजपनं तर आतापर्यंत तब्बल १४६ उमेदवार जाहीर केलेत. विशेष म्हणजे जागावाटपात मित्रपक्षाकडे गेलेल्या जागेवरही भाजपमधील इच्छुकांनी मित्रपक्षात प्रवेश करून संधी साधलीय. भाजपसोडून शिवसेना राष्ट्रवादीत गेलेल्या किती जणांनी उमेदवारीची संधी साधलीय. निलेश राणे, राजकुमार बडोले, संजयकाका पाटील, मुरजी पटेल... हे सगळे कट्टर भाजप नेते.... पण विधानसभेसाठी यांनी मनात कमळ ठेऊन हाती धनुष्यबाण आणि घड्याळ बांधलंय. निवडणुकीसाठी उमेदवारी देताना पक्षातील निष्ठावान नेता किंवा कार्यकर्त्यांला संधी दिली जाते अशी एक साधारण परंपरा आहे. मात्र,आता या छेद देत मित्र पक्षातील इच्छुकांना आयात करून उमेदवारी देण्याची एक नवीन परंपरा सुरू झालीय. २०१९मध्ये सुरु झालेला ट्रेंड यावेळी तर सर्रास वापरला गेलाय. महायुतीच्या उमेदवार यादीवर नजर टाकल्यास तब्बल ९ जणांनी तात्पुरती व्यवस्था म्हणून शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या चिन्हावर निवडणूकीच्या मैदानात उडी घेतलीय.




## उद्धव ठाकरेंनी ऐनवेळी उमेदवार बदलला! भाजपा नेत्याला केली उमेदवारी; सगळं गणितच बदललं




चोपड्यातून जाहीर केलेला उमेदवार बदलला आहे. राजू तडवी यांच्याऐवजी प्रभाकर सोनवणे यांना संधी देण्यात आली आहे. भाजपाच्या प्रभाकर सोनवणे यांचा आज ठाकरे गटात पक्ष प्रवेश झाला असून त्यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

# ठाकरेंच्या शिवसेनेकडून सुजय विखे-पाटलांची दुर्योधनाशी तुलना! म्हणाले, 'जयश्री थोरातांबाबत वापरलेली भाषा फडणवीसांना...'

''शिंदे सरकारने महिलांची मते मिळविण्यासाठी 'लाडकी बहीण'योजनेची सुरुवात केली. आपणच कसे तारणहार आहोत व महिलांच्या खात्यात १५०० रुपये जमा करून महिलांची कशी काळजी घेत आहोत हे दाखवले जात असले तरी भाजपची 'संस्कृती' काय त्याचे दर्शन रोज घडत आहे. ज्येष्ठ काँगेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या सुविद्य कन्या जयश्री थोरात यांच्याविषयी ज्या अर्वाच्य, अश्लील भाषेचा प्रयोग भाजप पुढाऱ्यांनी केला, त्याचा निषेध करावा थोडाच,'' असं उद्धव ठाकरेंच्या पक्षाने म्हटलं आहे. ''डॉ. जयश्री या संगमनेर युवक काँग्रेसच्या तालुकाध्यक्षा आहेत. संगमनेरमधील एका सभेत ''माझा बाप सगळ्यांचा बाप,'' असे वक्तव्य करताच भाजपचा स्थानिक नेता वसंत देशमुख याने अत्यंत घाणेरड्या शब्दांत जयश्री थोरात यांच्यावर लाखोली वाहिली. देशमुख महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जाहीर धिंडवडे काढत असताना 'विखे'पुत्र व्यासपीठावर दुर्योधनाप्रमाणे थाप मारीत विकट हास्य करीत होते व भाजप समर्थक श्रोते टाळ्या वाजवून विकृत वसंत देशमुखला उत्तेजन देत होते,'' असं ठाकरेंच्या पक्षाने म्हटलं आहे. सत्ता बदलली की बाप बदलणारे हे लोक ''जयश्री थोरात या काँग्रेस पक्षाचे तरुण नेतृत्व आहेत. त्यांच्या भाषणात तसे काहीच चुकीचे नव्हते. ''माझा बाप हा सगळ्यांचा बाप या वक्तव्याबद्दल वसंत देशमुखाच्या विजारीत मिरच्या झोंबण्याचे कारण काय? भाजपवाल्यांचे मायबाप मोदी-शहा आहेत, पण अनेक बाटगे भाजपात सामील होऊन त्यांनी मोदी-शहा आपले बाप असल्याचे जाहीर केले. सत्ता बदलली की बाप बदलणारे हे लोक आहेत व त्यात नगर जिल्हाही मागे नाही. नगर जिल्ह्यात सुजय विखे यांचा पराभव लोकसभेत झाला व सुजय यांच्या पूज्य पिताश्रींना पराभवाचा सामना करावा लागत आहे. त्यांच्या शिर्डी विधानसभा मतदारसंघात रणरागिणी प्रभावती घोगरे यांनी राधाकृष्ण विखे पाटलांचा पराभव करण्याचा चंग बांधला आहे. त्यामुळे विखे व त्यांच्या भाजपचा महिलांवर राग राग सुरू झाला. त्यातून शिर्डीत प्रभावतीताई व संगमनेरात जयश्रीताई यांच्यावर घाणेरड्या शब्दांत हल्ले सुरू आहेत,'' असा टोला लगावण्यात आला आहे. इतका विलंब का केला? ''जयश्री थोरात यांच्या बाबतीत विखे समर्थक देशमुखने घाणेरडे शब्द वापरताच त्याचे तीव्र पडसाद उमटले. वसंत देशमुखला अटक करा या मागणीसाठी हजारो महिलांनी पोलीस स्टेशनसमोर आंदोलन केले. संतप्त तरुणांनी संगमनेरात जाळपोळ केली. अनेक गावांत कडकडीत बंद पाळून विखे-देशमुख विकृतीचा निषेध केला, पण



त्या देशमुखवर गुन्हा दाखल करायला फडणवीस-विखेंचे पोलीस तयार नव्हते. अखेर जनतेच्या संतापाचा रेटा खूपच वाढला आणि दोन दिवसांनी वसंत देशमुख याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून फडणवीसांच्या पोलिसांनी त्याला अटक केली. महिलांची बदनामी करणाऱ्यांना, अत्याचार करणाऱ्यांना संरक्षण द्यायचे हेच भाजपचे धोरण स्पष्ट दिसते. वसंत देशमुख या चिल्लर माणसाला अटक करून त्याच्यावर कारवाई फडणवीस यांच्या गृह मंत्रालयाने इतका विलंब का केला?'' असा सवाल ठाकरेंच्या पक्षाने विचारला आहे. वसंत देशमुख हा विख्यांचा हस्तक ''वसंत देशमुखला अटक होऊ नये म्हणून पोलिसांवर कोणाचा दबाव होता हे नगर जिल्ह्यातील जनतेस माहीत आहे. आपल्या राजकीय विरोधकांवर खुनी हल्ले करून दहशत माजवायची हे उद्योग विखे साम्राज्यात सुरूच आहेत. शहरात जगतापांची दादागिरी व ताबेदारी, तर उरलेल्या जिल्ह्यात विखे मंडळींची हाणामारी असे चित्र आहे. विखे यांचे पुत्र लोकसभा निवडणुकीत पराभूत झाले ते याच दादागिरीमुळे. लोकांच्या संतापाचा उद्रेक झाला व त्यांनी विखे यांचा पराभव केला. त्या पराभवामागे बाळासाहेब थोरातांचे नियोजन असल्याचा राग विखे समर्थकांच्या मनात खदखदू शकतो, पण म्हणून थोरातांच्या घाणेरड्या शब्दांत चिखलफेक करण्याचे समर्थन कोणी करणार नाही. वसंत देशमुख हा विख्यांचा हस्तक आहे. त्यामुळे झाल्या प्रकाराबद्दल विखेंनी समस्त महिला वर्गाची माफी मागायला हवी होती. तसे झालेच नाही. उलट वसंत देशमुखला वाचवण्याची मोहीम त्यांनी सुरू केली. लाडक्या बहिणी फक्त १५०० रुपयांच्या बदल्यात मते विकत घेण्यापुरत्याच आहेत का? असा प्रश्न पडतो,'

# महाविजय निर्धार रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी व्हा - विष्णु पाचफुले



अर्जुन खोतकर

जालना / प्रतिनिधी
-----------

जालना विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार शिवसेना उपनेते ,माजी मंत्री अर्जुनराव खोतकर हे धनत्रयोदशीच्या शुभ मुहूर्तावर मंगळवारी ( ता. २९) विराट जनसमुदायाच्या साक्षीने आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असून या निमित्ताने आयोजित महाविजय निर्धार रॅलीत महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह शहर आणि ग्रामीण भागातील युवक,मतदारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेनेचे जालना शहर प्रमुख विष्णु पाचफुले यांनी केले आहे.

महाविजय निर्धार रॅलीच्या पूर्वसंध्येस प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात गणेश मोहिते यांनी म्हंटले आहे की, गेल्या चार दशकांपासून सर्वसामान्य जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी समाजकारण, राजकारण आणि शिवसेनेत कार्यरत असलेले माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विश्वास दाखवत पक्षातर्फे सलग आठव्यांदा जालना विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली. उद्या सकाळी ०९.३० वा. मामा चौक येथून महाविजय निर्धार रॅलीस प्रारंभ होणार आहे. बाजार पेठ, प्रमुख मार्गाने जात भाग्यनगर येथे रॅलीचे अतिविराट सभेत रूपांतर होणार असून जालना शहरासह ग्रामीण भागातील जनतेने विकासाचा रथ पुढे नेण्यासाठी मोठ्या संख्येने रॅलीत सहभाग नोंदवावा आणि अर्जुनराव खोतकर यांच्या उमेदवारी अधिक बळकट करावी, असे आवाहन जालना शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांनी केले आहे.



विष्णू पाचफुले

## संक्षिप्त

### शक्ती प्रदर्शन न करता कैलास गोरंटयाल यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**मविआ नेते, पदाधिकाऱ्यांची उपस्थिती**

**जालना (प्रतिनीधी)** जालना विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ.कैलास गोरंटयाल यांनी आज सोमवारी कोणतेही शक्ती प्रदर्शन न करता महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकाऱ्यांसह जावून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. जालना विधानसभा मतदार संघातून गोरंटयाल यांना दोन दिवसांपूर्वीच काँग्रेस पक्षाच्या वतीने उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. जालना



लोकसभेचे पक्षाचे प्रभारी डॉ.पी.सी.शर्मा, खा. डॉ. कल्याण काळे, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख मुरलीधर शेजुळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष नंदकिशोर जांगडे, काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्याक सेलचे प्रदेश पदाधिकारी बदर चाऊस, अब्दुल रउफ परसुवाले, रिपाईचे पदाधिकारी किशोर मघाडे, सपाचे जिल्हाध्यक्ष शेख नबी शिपोरकर, आपचे जिल्हाध्यक्ष संजोग हिवाळे, विधीज्ञ जक्कलवार, सय्यद याकूब आदींची यावेळी उपस्थिती होती. जालन्याचे उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमंत हरकर व तहसिलदार तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी श्रीमती छाया पवार यांच्याकडे महाविकास आघाडीचे उमेदवार आ. कैलास गोरंटयाल यांनी पक्षाच्या एबी फॉर्मसह आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी उपस्थित पत्रकारांशी बोलतांना उमेदवार आ. कैलास गोरंटयाल यांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवारांवर जोरदार टीका करत निवडणुकीतील आपले इरादे स्पष्ट केले.

### भोकरदन -जाफराबाद विधानसभा निवडणुकीसाठी २४ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले

भोकरदन-जाफराबाद विधानसभा मतदारसंघ १०३ सर्वत्रिक निवडणूक २०२४ विधानसभा निवडणुकी साठी दिनांक २८ सोमवार रोजी तब्बल २४ जणांनी आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले असल्याची माहिती येथील निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली असून यामध्ये डॉ. कृष्णा मदनराव कोरडे, अपक्ष, डॉ. मनोरखा रशिदखा पठाण, अपक्ष,कडूबा विनायक बोरशे, अपक्ष ,शे. नजीर अहमद महमद इलीयास मदनी, अपक्ष,सुरेश पंढरीनाथ तळेकर, अपक्ष,नानासाहेब पांडुरंग वानखेडे, अपक्ष,सखाराम पुंजाजी भालके, अपक्ष, अॅड साहेबराव माधवराव पंडीत, हिंदुस्थान जनता पक्ष,राहुल जालींदर छडीदार, बहुजन समाज पार्टी अपक्ष, यासीन सलीम मदार अपक्ष,केशव रामकिसन देठे, अपक्ष,केशव आनंदराव जंजाळ, अपक्ष,रमेशराव पाटीलबा गव्हाड शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे अपक्ष,योगेश देविदास शिंदेअपक्ष,वैशाली सुरेश दाभाडे अपक्ष,महजाद इस्लाम खान अपक्ष,नारायण त्रिंबक सोन्नी अपक्ष,मयुर रामेश्वर बोर्डे (स्वाभिमानी संघटना) कैलास रामदास पाचगे, अपक्ष महादु लक्ष्मण सुरडकर, अपक्ष आजपर्यंत एकुण २९ उमेदवार यांनी ३६ नामनिर्देशन अर्ज सादर केलेले आहे. आजपर्यत एकुण १०६ इच्छुक उमेदवारांना २४६ नामनिर्देशन अर्जाचे वितरण करण्यात आलेल आहे, दरम्यान दिनांक २९ ऑक्टोबर २०२४ रोजीपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते ०३ या वेळे त आपले नामनिर्देशन पत्र सादर करता येणार आहे. दिनांक ३० ऑक्टोबर २०२४ रोजी नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात येणार आहे. तसेच दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४ पर्यत उमेदवारांना आपले अर्ज मागे घेता येणार आहे.

### पवन कोळी याची राज्य लॉन टेनिस स्पर्धेसाठी निवड



जालना/ प्रतिनिधी - जालना शहरातील रहिवासी पवन सतीश कोळी याने बीड येथील चंपावती क्रीडा संकुलात पार पडलेल्या विभागीय लॉन टेनिस स्पर्धेत उपविजेतेपद पटकावले असून, नोव्हेंबर महिन्यात बारामती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. ही जालन्यासाठी अभिमानास्पद बाब आहे.

विभागीय स्पर्धेत प्रत्येक फेरीत प्रतिस्पर्ध्यांवर मात करत पवन कोळी याने अंतिम फेरी गाठली आणि उपविजेतेपद पटकावले. त्यामुळे त्याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. पवनने गतवर्षीही राज्यस्तरीय स्पर्धेत उपविजेतेपद पटकावून राष्ट्रीयस्तरावर राज्याचे नेतृत्व केले होते. राष्ट्रीय स्पर्धेत तो पाचव्या क्रमांकावर राहिला होता. नोव्हेंबर महिन्यात बारामती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत चमकदार कामगिरी करून राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदविण्यासाठी आपले पुरेपूर प्रयत्न राहतील, असा मनोदय पवनने व्यक्त केला. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्याला अनेकांनी शुभेच्छा दिल्या.

## परतूर विधानसभा मतदारसंघात भाजपचा सुफडा साफ करा - लक्ष्मण वडले...

तभा वृत्तसेवा मंठा / प्रतिनिधी : राज्य व केंद्रातील भाजप सरकारने फसव्या योजना आणून शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांना लुटले, जाती-जातीत भांडणे लावणारे हे बेईमान सरकार असून या मतदारसंघातूनच नव्हे तर राज्यातून दळभद्री सरकारचा सुपडा साफ करा असे आवाहन शिवसेना उपनेते लक्ष्मण वडले यांनी केले. परतुर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार शिवसेना जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांच्या नामांकन अर्ज भरण्याच्या रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी खा. संजय जाधव, शिवसेना उपनेते लक्ष्मण वडले, महाविकास आघाडीचे उमेदवार ए जे बोराडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस पंकज बोराडे, काँग्रेसचे प्रदेश सचिव एड. अन्वर देशमुख, भास्कर आंबेकर, अनिरुद्ध खोतकर, अंकुशराव अवचार, माधवराव कदम, बाबासाहेब तेलगड, अशोक आघाव, हरिहर शिंदे, मनीष श्रीवास्तव, जगन्नाथ काकडे, संभाजी खंदारे, दीपक लावणीकर, एड. अविनाश राठोड, अजय अवचार, सुदर्शन सोळंके, बबनराव गणगे, हरिभाऊ चव्हाण, नितीन राठोड, संजय राठोड, बाबाराव राठोड यांच्यासह महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. या भव्य रॅलीत महाविकास आघाडीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह परतूर - मंठा - नेर - सेवली भागातील कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने रॅलीत सहभागी झाले होते. रेल्वे स्टेशन भागातून मुख्य रस्ता मार्गे इंदिरा मंगल कार्यालयापर्यंत फटाक्यांची आतिषबाजी, महाविकास आघाडीचा विजय असो अशा घोषणा देत रॅलीचा समारोप करण्यात आला यावेळी झालेल्या सभेत महाविकास आघाडीचे शिवसेना उपनेते लक्ष्मण वडले यांनी भाजपवर कडाडून टीका केली. या मतदारसंघातून भाजपच्या उमेदवाराला हद्दपार करून सर्वसामान्य कार्यकर्ता असलेल्या महाविकास आघाडीचे उमेदवार ए.जे. बोराडे यांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन केले. यावेळी भास्कर आंबेकर म्हणाले की, भाजपाला या मतदारसंघातून पायउतार करण्याची हीच खरी वेळ आहे. त्यामुळे सर्वसामान्य लोकांच्या संपर्कात असलेले ए. जे. बोराडे यांना मोठ्या




मताधिक्याने विजयी करा असे आवाहन केले. अनिरुद्ध खोतकर यांनी श्री बोराडे यांना पक्षाने न्याय दिला असून आता जनतेने विजयाची सूत्रे हाती घ्यावीत असे सांगितले. राष्ट्रवादीचे नेते पंकज बोराडे ज्यांनी भाजप सरकारचा खरपूस समाचार घेतला. यावेळी त्यांनी मतदारसंघातील भाजपवर खडसून टीका केली. एकीकडे लाडक्या बहिणींना पैसे देता आणि दुसरीकडे दाजींकडून महागाईच्या नावावर वसूल करता असा टोला लगावला. महाविकास आघाडीचे उमेदवार ए जे बोराडे यांनी सांगितले की, मागील २५ ते ३० वर्षापासून सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणून मी मतदारसंघात काम करीत आहे, या मतदारसंघातील हुकूमशाहीला, दंडेलशाहीला आणून पाडण्यासाठी माय बाप जनतेने मला आशीर्वाद द्यावा असे आवाहन केले. यावेळी काँग्रेसचे नेते एड. अन्वर देशमुख, बाबासाहेब तेलगड, जगन्नाथ काकडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बेबीताइ पावसे, संतोष शिंदे बाजीराव खरात गौतम सदावर्ते, आबा कदम, प्रदीप ठोके, तुळशीराम कोहिरे, मधुकर पाईकराव यांच्यासह सर्व आजी माजी नगरसेवक, आजी माजी जिल्हा परिषद सदस्य, परतूर - मंठा - नेर - सेवली भागातील महाविकास आघाडीचे सर्व कार्यकर्ते व मतदारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार चंद्रकांत दानवे

**यांनी जाहीर सभेतून महिलांबाबत केलेल्या अश्लील टिपणीच्या निषेधार्थ महायुतीच्या महिला आघाडीच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले**

भोकरदन प्रतिनिधी -
सोमवार दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ रोजी भोकरदन येथे भाजपा महायुती महिला आघाडीच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांनी जाहीर सभेला संबोधित करताना माता-भगिनींबाबत केलेल्या अश्लील टिप्पणी च्या निषेधार्थ आंदोलन करून निषेध व्यक्त करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस (श्री.अजितदादा पवार) पक्षाच्या जिल्हाध्यक्ष सौ. वंदनाताई खांडेभराड व जि.प. सदस्या सौ. आशाताई पांडे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी तहसीलदार भोकरदन व पोलीस निरीक्षक भोकरदन यांना निवेदन देऊन तातडीने गुन्हा दाखल करण्यात येण्याची मागणी महिला आघाडीच्या वतीने करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांनी शुक्रवार दिनांक २५ ऑक्टोबर २०२४ रोजी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर नगरपरिषद कार्यालयासमोर झालेल्या जाहीर सभेस संबोधित करताना विशिष्ट कार्यकर्त्यांनी त्यांची



माय नीट निजवावी असा उल्लेख करून महिला भगिनींचा अश्लील भाषेत अपमान केला होता. महिलांचा राजकारणाशी काहीही संबंध नसताना व भारतीय संस्कृतीमध्ये महिलांचे पूजन करण्याची रीत असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांनी मात्र संबंधित कार्यकर्त्यांनी आपली माय नीट भिजवावी अशा अश्लील भाषेमध्ये महिला भगिनींचा उल्लेख करून समस्त स्त्री जातीचा अपमान केलेला आहे. सदरील बाब केवळ चंद्रकांत दानवे व राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षच नव्हे तर भारतीय संस्कृतीला काळीमा फासणारी असून देशातील तमाम महिलांचा अपमान करणारी आहे. त्यामुळे भाजपा महायुती महिला आघाडीच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्ष व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांच्या प्रतिमेला चपला मारून जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. व त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करून गुन्हा नोंद करण्यात यावा अशी मागणी यावेळी करण्यात आली.याप्रसंगी महायुती महिला आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्या व मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती होती.

## मराठा सेवक अरविंद देशमुख यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**जालना/प्रतिनिधी :**
------------

संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत काही ठिकाणी उमेदवार निवडणूक रिंगणात उतरविण्याचा निर्णय घेऊन इच्छुकांना उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या सूचना दिल्या आहेत. जालना विधानसभा मतदारसंघात अनेक इच्छुक असून, त्यापैकी एक असलेले अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष आणि अनेक प्रश्नांवर सातत्यपूर्ण लढा देणारे लढवय्ये, बहुआयामी व्यक्तिमत्व अरविंद देशमुख यांनी आज सोमवार दि. २८ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल केला.

उमेदवारी अर्ज दाखल करताना अरविंद देशमुख यांच्यासमवेत मराठा महासंघाचे जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष चव्हाण, युवक आघाडीचे जिल्हाध्यक्ष अॅड. शैलेश देशमुख, मंगेश मोरे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. कोणत्याही प्रकारचे शक्ती प्रदर्शन न करता त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. कुणाचेही नाव निश्चित न करता मनोज जरांगे पाटील यांनी इच्छुकांना उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा सूचना दिल्या होत्या. त्यानुसार आपण उमेदवारी दाखल केलांअसून, श्री. जरांगे हे ज्यांचे नाव निश्चित करतील, त्यावेळी सर्व इच्छुक उमेदवारी अर्ज मागे घेऊन जरांगे यांनी सुचविलेल्या उमेदवारांचे एकदिलाने काम करतील आणि निवडून आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करतील, असे अरविंद देशमुख यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांशी बोलताना सांगितले.

अरविंद देशमुख हे गेल्या दोन दशकापासून मराठा महासंघात सक्रिय आहेत. मराठा आरक्षणासाठी मराठा क्रांती मोर्चाचे एक मराठा - लाख मराठा आंदोलन, आरक्षण संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांचे सातत्याने सुरू असलेले आंदोलन, जालना शहरातील विकास आणि नागरी समस्या, शेतकरी, विद्यार्थी, बांधकाम कामगार, महिला, ज्येष्ठ नागरिक यांच्या प्रश्नावरील आंदोलनात त्यांचा सातत्यपूर्ण सक्रिय सहभाग राहिलेला आहे. अवैध धंद्यांच्या विरोधात ते आक्रमक भूमिका घेतात. कोणत्याही आंदोलनाच्यावेळी प्रतिबंधक उपाय म्हणून पोलिसांकडून निघणाऱ्या नोटीसमध्ये त्यांचे नाव अग्रक्रमावर असते. जालना नगरपालिका असताना, छत्रपती संभाजी राजे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, महात्मा फुले यांचे पुतळे बसविण्यासाठी त्यांनी रस्त्यावरचा लढा लढला आणि उपलब्ध असलेले मात्र बसविण्यासाठी चालढकल करणाऱ्या जालना नगरपालिकेला पुतळे उभारण्यास भाग पाडले. नागरी समस्या आणि विकासाच्या मुद्द्यावरील आंदोलनाबद्दल अरविंद देशमुख यांच्याविरुद्ध अनेक गुन्हे दाखल झालेले आहेत.

सामाजिक क्षेत्राबरोबरच क्रीडा क्षेत्रातही अरविंद देशमुख यांचे बहुमोल योगदान राहिलेले आहे. जिल्हा तायक्वांदो असोसिएशनचे ते जिल्हाध्यक्ष आणि उत्कृष्ट प्रशिक्षक आहेत. स्वसंरक्षणासाठी युद्धकलेचे केवळ धडे ते देतात. विविध खेळ प्रकारातील खेळाडू घडवून त्यांना राज्यस्तरावरील पुरस्कारापर्यंत प्लॅटफॉर्म मिळवून देण्याचेचे महत्वपूर्ण कार्य ते करत आले आहेत. अरविंद देशमुख यांचे सर्वधर्मियांशी मैत्रीचे संबंध असून, त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. त्यांच्या उमेदवारीनंतर अनेकांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## पाटील जो आदेश देतील तो मान्य असेल - महेश नळगे.

**जरांगे पाटील समर्थक महेश नळगे यांचा उमेदवारी अर्ज दाखल.**

**परतूर प्रतिनिधी :-**
संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार परतूर - मंठा विधानसभा मतदारसंघातून आठ ते दहा इच्छुक समर्थकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

यामध्ये शिवमुद्रा प्रतिष्ठान चे अध्यक्ष महेश रामेश्वर नळगे यांनी शक्ती प्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या प्रसंगी नळगे यांनी युवकांना संबोधित करताना सांगितले की, मनोज दादांनी आदेश दिल्या नुसार मी माझा उमेदवारी अर्ज दाखल केला. मनोज दादांनी जर मला संधी दिली तर दोन्ही तालुक्यातील अठरा अगड जातीतील समाज बांधवांना सोबत घेऊन प्रस्तापितांच्या छातीवर बसून प्रचार प्रसार करू. व या सर्वांच्या नाकावर टिच्चून निवडून येणारच. त्यासाठी मी आज पर्यंत जे कार्य केलेले आहे त्यानुसार तालुक्यात माझा सर्व समाजातील बांधवांशी जवळचा संबंध आहे. म्हणून मला संधी मिळाल्यास आपला विजय नक्की आहे. नळगे यांच्यासह प्रा. पुरुषोत्तम वायाळ, कुलदीप बोराडे, प्रा. पांडुरंग नवल, गजानन चवडे, नामदेव धुमाळ सह आठ ते दहा समर्थकांनी ऊमेदवारी अर्ज दाखल केले.

### विकासाची व्याख्या बदलणार :- नळगे

विकासाची व्याख्या आजपर्यंत राजकारण्यांनी रस्ते नाली, पाणी आणिविज अशी केलेली आहे. ती संघर्ष योद्धा मनोज जारांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शेती पूरक उद्योग धंदे, युवकांच्या हाताला काम, शेतमालाला योग्य तो भाव या संकल्पनेतून परतूर-मंठा, नेर सेवली मतदार संघाचा सर्वांगीण विकास व गरजवंतांना न्याय ही भूमिका पार पडणार आहे.




## उमेदवारी अर्ज भरण्यासाठी हजारो मतदारानी उपस्थित राहण्याचे आमदार लोणीकर यांचे मतदारांना आवाहन

**नामनिर्देशन पत्र दाखल करण्याकरता २५००० मतदार उपस्थित राहणार असल्याचा आमदार लोणीकरांचा दावा**

**तभा वृत्तसेवा**
**परतूर / प्रतिनिधी**
---------

परतूर विधानसभा मतदारसंघात शेगाव पंढरपूर दिंडी महामार्ग या सह प्रमुख राज्य मार्ग महामार्ग जिल्हा मार्ग गावा गावाला जोडणारे रस्ते, प्रत्येक रस्त्यावर पूल, गावागावातील तांडे वाड्या वस्त्यावरील पाणंद रस्ते परतुर शहरातील उड्डाणपूल, स्वर्गीय भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वातानुकूलित नाट्यगृह, वंदनीय विश्वरत्न परम पूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह तालुका व जिल्हा सत्र न्यायालयाच्या इमारती, क्रीडा संकुल, गावा गावात २४ तास वीज उपलब्ध होण्यासाठी नवीन पोल व डिप्या करीता आणी मतदार संघाच्या सर्वांगीन विकासासाठी आपण केंद्र व राज्य सरकार च्या माध्यमातून गेल्या पाच वर्षात सात हजार कोटी रुपये निधी उपलब्ध करून आणला असल्याची माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.

भारतीय जनता पार्टी व महायुती ची अधिकृत उमेदवारी जाहीर झाल्यानंतर स्वतःच्या मूळ गावी ग्रामदैवतांचे दर्शन घेण्याच्या निमित्ताने आमदार बबनराव लोणीकर लोणी येथे पोहोचले असता नागरिकांनी आयोजित केलेल्या सत्कार समारंभ सोहळ्या प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर यांनी आपण परतुर विधानसभा मतदार संघात केलेला सर्वांगीण विकास हाच मुद्दा सर्वसामान्य जनतेपर्यंत घेऊन जाणार असल्याने परतुर विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य जनता मला ३० हजाराच्या मताधिक्याने विजयी करेल असा दावाही यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी केला.


आमदार बबनराव लोणीकर पुढे बोलताना म्हणाले की परतुर तालुक्यात ६३४९ घरकुला करीता (८० कोटी रुपये), मंठा तालुक्यातील ६९६१ घरकुला करीता (१०१ कोटी रुपये) व जालना तालुक्यातील १४८४ घरकुला करीता (१८ कोटी रुपये) परतूर विधानसभा मतदारसंघात अशा एकूण १४७८४ घरकुलासाठी १९९ कोटी रुपयांच्या निधी अहिल्यादेवी होळकर आवास योजना, यशवंतराव चव्हाण घरकुल योजना, शबरी आवास योजना. रमाई आवास योजना आणी मोदी आवास योजनेचा लाभ गावागावातील नागरिकांना लाभार्थ्यांना मिळवून देण्याकरिता आपण परतुर व मंठा येथे आढावा बैठकी घेऊन विशेष कॅम्पचे आयोजन करून जिल्हाधिकारी जालना यांच्या जालनात बैठक घेऊन निधीची मागणी करत सर्वसामान्यांना घराचा आधार मिळावा याकरिता विशेष प्रयत्न केला आहे.

पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की मंठा व परतुर या दोन उपजिल्हा रुग्णालयासाठी प्रत्येकी ६० कोटी रुपये प्रमाणे १२० कोटी रुपये वाटूर आष्टी दहिफळ खंदारे ढोकसाळ श्रीष्टी व सातोना या सहा प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी प्रत्येकी ६ कोटी २२ लाख रुपये प्रमाणे ३७ कोटी ३२ लाख रुपये तर खोराड सावंगी व उस्वद येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी प्रत्येकी ५५ लाख रुपये याप्रमाणे १ कोटी १० लाख रुपये निधी आपण मंजूर करून आणला असल्यामुळे परतुर विधानसभा मतदारसंघात आता रुग्णांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध होणार असल्याचं यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी आवर्जून नमूद केलं.



यावेळी उपस्थित लोणीकर साहेब यांचे ज्येष्ठ सहकारी आनंताजीजा यादव महारुद्र आप्पा आवटे जगन्नाथ काकाजी यादव गोविंद मामा चव्हाण दिगंबर अप्पा अंकुशकर आसाराम आप्पा अंकुशकर विनायकराव शिवाजी जोशी वामन काका पडघन ननवरे अशोक बाप्पा यादव बळीराम बेरसले विश्वंभर अप्पा अंकुशकर तुकाराम जी नवघरे विश्वनाथ नाटकर अप्पा अंकुशकर अंकुश देशमुख धोंडीबा गोरे राधाकिसन कवळे उद्धवबापू कवळे विठ्ठल राव तौर भगवानराव यादव रामजी तात्या यादव यशवंत यादव लक्ष्मण यादव विजय यादव उत्तमराव तूवर भीमराव ननवरे सरदार भाई पठाण मुस्तफा शेख बबनराव यादव सुनील पडघन अनिल पडघन प्रल्हाद नन्नवरे बाळू नन्नवरे सचिन बेलसले माणिक राठोड बालासाहेब यादव श्रीरंग यादव बन्सी यांना नाटकर लिंबाबा साळवे हरिभाऊ ससाने अशोकतौर अशोक कवळे नामदेव पवार विनायक राठोड सतीश पवार दत्ता पवार प्रताप अंभोरे शिवाजी चव्हाण मोहन नवघरे बबन आप्पा शेटे अशोक आबा आवटे अनंत यादव दत्ताभाऊ अंकुशकर पांडुरंग वाघमारे रमेशराव तौर बाळासाहेब आवटे महेश अंकुशकर बाळकृष्ण अंकुशकर मोहन नवघरे दिलावर पठाण दत्ता जाधव महादेव तुवर मोहन तुवर मास्तर तुवर विकास तुवर विश्वनाथ चव्हाण सदाशिव बेरसले काशिनाथ दिलावर पठाण रखमाजी सुरवसे सुंदरराव गायके नानाभाऊ बहिरे भारत पवार शिवाजी पवार बंडू वाशिंबे राजू चव्हाण नरसिंह यादव संतोष यादव शाळीग्राम तौर कृष्णा वाघमारे पुरुषोत्तम यादव अशोक चव्हाण भागवत कवळे दीपक नन्नवरे विकास अंकुशकर रोहन अंकुश कर महादेव तूवर सरपंच गजानन लोणीकर तसेच गावातील सर्व ज्येष्ठ नागरिक व युवक मंडळ उपस्थित होते .

दैनिक
# झुंजार जनता
४
मंगळवार दि.२९/१०/२०२४






## कल्याणमध्ये महाविकास आघाडीत बिघाडी; ठाकरे गटाला चारही जागा गेल्याने काँग्रेस पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

कल्याण :- दोन्ही मतदारसंघात ठाकरे गटाने उमेदवारी जाहीर केली. यानंतर महाविकास आघाडीमधील धुसफूस चव्हाट्यावर आली आहे. कोकणासह कल्याण- डोंबिवलीत काँग्रेस पक्षाला एकही विधानसभा जागा मिळालेली नाही. यामुळे काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. महाविकास आघाडीने जागा वाटपात कोकणासह कल्याण डोंबिवलीत काँग्रेसला बाजूला ठेवल्याचा आरोप करत कल्याण डोंबिवलीतील कोंग्रेसच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी पदांचे सामूहिक राजीनामे दिले आहेत. आज झालेल्या पत्रकार परिषदेत कोंग्रेस पदाधिकाऱ्यांनी आक्रमक भूमिका मांडली. कल्याण- डोंबिवलीमधील कल्याण पूर्व आणि कल्याण पश्चिम विधानसभा मतदार संघावर काँग्रेसने दावा केला होता. मात्र या दोन्ही मतदारसंघात ठाकरे गटाने उमेदवारी जाहीर केली. यानंतर महाविकास आघाडीमधील धुसफूस चव्हाट्यावर आली आहे. दरम्यान काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी आपली भूमिका मांडत महाविकास आघाडीत (चरहरींळझ्ररी अरसहरवळ) काँग्रेसची स्थिती दुय्यम का? असा सवाल केला आहे. जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सचिन पोटे यांनी नाराजी व्यक्त करत आम्ही लोकसभेत तुतारीचे काम करायचे आणि विधानसभेत मशालचे काम करायचे का? कोकणासह कल्याण- डोंबिवलीत काँग्रेसला बाजूला ठेवून शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाला संधी दिली गेल्याचा आरोप त्यांनी केला. तर पाठींबा देणार नाही दरम्यान काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी पक्षाला जिवंत ठेवायचे असेल, तर कल्याण पूर्व आणि कल्याण पश्चिम या विधानसभा जागांबाबत दोन दिवसांत निर्णय घ्यावा. अन्यथा, काँग्रेस कार्यकर्ते महाविकास आघाडीला पाठिंबा द्यायचा की नाही, याबाबत निर्णत घेतील; असे आवाहन केले आहे. दरम्यान कोंग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांनी दोन दिवसांपूर्वी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. याबाबत त्यांनी सांगितले की कोंग्रेस पक्षाच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केला, अद्याप मला एबी फॉर्म मिळाला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# नगरमध्ये आता 'आव्वाज कुणाचा'?

**नगर / सोलापूरी झटका न्यूज :** अरे आव्वाज कुणाचा?' 'कोण आला रे कोण आला' या उच्च रवातील घोषणा आणि त्यांना तेवढ्याच जोरदारपणे मिळणारा प्रतिसाद असे वातावरण मधल्या ३० ते ३५ वर्षांत नगरकरांनी अनुभवले आहे. अशी घोषणा झाली म्हणजे शिवसेनेचा मोर्चा किंवा प्रचार असणार हे नागरिकांना अंगवळणी पडले होते. अलीकडच्या काळात राज्यातील राजकारण बदलले आणि या आवाजाची धार कमी होते की काय? अशी शक्यता निर्माण झाली आहे. तीन पक्षांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या महाविकास आघाडी आणि नंतरच्या महायुतीमुळे राज्यातील अनेक ठिकाणी विविध पक्षांचे असे आवाज क्षीण होणार हे नक्की होते. शिवसेनेच्या बाबतीत अहिल्यानगर (जुने नाव अहमदनगर. खरे तर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी ठेवलेले अंबिकानगर) या मतदारसंघाचाही समावेश होत आहे. मागील दोन निवडणुकांत शिवसेनेचा पराभव झाला. आता तर उमेदवारीही मिळेनाशी झाली, अशी स्थिती झाली आहे. नगरला अगदी सुरवातीच्या काळापासून म्हणजे १९८९ पासून शिवसेना अस्तिवात आली. शहरात स्व. अनिल राठोड तर लगतच्या ग्रामीण भागात प्रा. शशिकांत गाडे आणि त्यांच्या तत्कालीन आणि आताच्या सहकाऱ्यांनी ती कष्टाने वाढविली. नगरमध्ये शिवसेना एवढी रुजली की राज्यात किती सरकारे आली आणि गेली, पण नगरकरांनी सलग पंचवीस वर्षे शिवसेनेला मते दिली. महानगरपालिकेची सत्ताही शिवसेनेच्या हाती सोपविली. महानगरपालिकेची स्थापना झाल्यावर पहिला महापौर भगवान फुलसौंदर यांच्या रुपाने शिवसेनेचाच झाला. जिल्ह्यातही शिवसेना वाढत गेली. ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांपर्यंत शिवसेनेला सत्ता मिळाली. नगरच्या शिवसेनेचा राज्यात आणि मुंबईतील वरिष्ठांमध्येही दबदबा होता. यावेळी मात्र नगर शहरात शिवसेनेवर मोठी नामुष्की येऊन ठेपली आहे. आमदार होणे दूर साधी उमेदवारीही पदरात पडणे कठीण झाले आहे. अर्थात याची सुरूवात दहा वर्षांपूर्वीच झाली. त्यामुळे राठोड यांच्यानंतर शिवसेनेला घरघर लागली असे म्हणता येणार नाही. राठोड त्यापूर्वी चारवेळा राष्ट्रवादीचे उमेदवार दादा कळमकर यांना पराभूत करून निवडून आलेले होते. तर नंतर दोन वेळा राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप यांच्याकडून राठोड यांचा पराभव झाला. राठोड यांनाही लोक भय्या म्हणत तर जगताप यांनाही भय्या म्हणतात. राठोड आणि जगताप कुटुंबियांतील राजकीय वैर कायम राहिले. दहा वर्षांपूर्वी आमदार जगताप यांनी महापौरपदाच्या माध्यमातून आधी केलेल्या कामांचा लाभ घेत नगरकरांची मते आपल्या बाजूने वळविण्यात यश मिळविले. सर्व सामान्यांना सहज उपलब्ध होणारा आमदार अशी राठोड यांची प्रतिमा असल्याच्या काळात जगताप यांनी तेवढीच घावपळ करीत हेच विशेषण स्वत:कडेही खेचून घेतले. पहिल्यांदा आमदार झाल्यानंतर त्यांनी जनसंपर्क वाढता ठेवला आणि दुसऱ्यांदा राठोड यांचा म्हणजेच शिवसेनेचा पराभव करून आमदार झाले. मधल्या काळात तर पिता-पुत्र दोघेही आमदार होते. आपल्या विरूद्धच्या बऱ्यावाईट चर्चा पचवत त्यांनी शहरात आपले स्थान पक्के करण्याचा प्रयत्न केला. स्थानिक राजकारणात शिवसेनेला बाजूला ठेवण्यासाठी त्यांनी प्रसंगी भाजपला जवळ आणि मोठेही केले. आता तर जगताप महायुतीसोबत अधिकृतपणे आहेत. लोकसभा निवडणुकीतही त्यांनी महायुतीला आपल्या मतदारसंघातून लक्षणीय मतदान घडवून आणले. तर दुसरीकडे महाविकास आघाडीसोबत असलेल्या आणि लोकसभा निवडणुकीत राठोड यांच्या निधनानंतरही आघाडीचा खासदार निवडून आणण्यात मोठा वाटा असलेल्या शिवसेनेला विधानसभेसाठी मात्र उमेदवारी मिळविण्यासाठी झगडावे लागत आहे. शिवसेनेची ही अवस्था होत असताना दोन्ही राष्ट्रवादी मात्र पल्समध्ये. कारण त्यांच्या दोन्ही गटांना संधी मिळत आहे. पूर्वीच्या काळातील काँग्रेस आणि त्यानंतर शिवसेना यांचा आवाज दाबून त्यावर राष्ट्रवादीने ताबा मिळविला. शिवसेनेप्रमाणे त्यांचेही दोन गट झाले. मात्र, नगर शहरातून शिवसेनेच्या दोन्ही गटांना आणि काँग्रेसलाही बाजूला सारून आपला आवाज सिद्ध करण्यासाठी राष्ट्रवादीचे दोन्ही गट सज्ज झाले आहेत. आता शहरात आवाज कुणाचा याचा फैसला २० नोव्हेंबरला नगरकर मतदार करणार आहेत.

## रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी महायुतीला विजयी करण्यासाठी प्रचाराला लागावे - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे निर्देश

**मुंबई / सोलापुरी झटका न्यूज :** - रिपब्लिकन पक्ष हा शिवसेना भाजप राष्ट्रवादी महायुतीचा घटक पक्ष आहे.रिपब्लिकन पक्षाला महायुतीतून मुंबईत धारावी आणि कालिना हे दोन मतदार संघ देण्यात आले आहेत तसेच महायुती ची सत्ता आल्यानंतर एक विधानपरिषद सदस्यत्व आणि राज्यात एक कॅबिनेट मंत्री पद तसेच ४ महामंडळ अध्यक्ष पदे आणि महामंडळ संचालक पदे जिल्हा तालुका शासकीय कमिटी सदस्य पदे तसेच महापालिका जिल्हा परिषदा



स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये रिपब्लिकन पक्षाला जागा देण्याचे महायुती डरे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठोस आश्वासन दीले आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या विकासासाठी; दलितांच्या विकासासाठी रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी नाराजी बाजूला सारून नव्या दमाने भाजप शिवसेना रिपाइं राष्ट्रवादी महायुती ला विजयी करण्यासाठी प्रचाराला लागावे असे आवाहन आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केले.

मुंबईत बांद्रा येथील ना.रामदास आठवले यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.यावेळी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर; राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे; मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे; सुरेश बार्शिंग; दयाळ बहादुर ; विवेक पवार;घनश्याम चिरनकर आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.रिपब्लिकन पक्षाला शिवसेना च्या कोट्यातून धारावी मतदारसंघ आणि भाजप च्या कोट्यातून कालिना हे मुंबईतील दोन मतदार संघ रिपब्लिकन पक्षाला सोडण्यात आले आहेत.त्या बाबतची अधिकृत घोषणा आज पत्रकार परिषदेत ना.रमदास आठवले यांनी केली.महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत आल्यानंतर रिपब्लिकन पक्षाला सत्तेत वाटा देण्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठोस आश्वासन दिले आहे त्यामूळे रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी नाराजी दूर सारून महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करावा असे आवाहन ना. रामदास आठवले यांनी केले आहे.

# कल्याणमध्ये चक्कीनाका येथे निवडणूक भरारी पथकाकडून लाखो रूपयांची विदेशी दारू जप्त

कल्याण :- येथील पूर्व भागातील चक्कीनाका भागात विधानसभा निवडणूक भरारी पथकाने शनिवारी संध्याकाळी एक लाख १० हजार रूपयांची विदेशी दारू एका वाहनातून जप्त केली. कल्याण येथील पूर्व भागातील चक्कीनाका भागात विधानसभा निवडणूक भरारी पथकाने शनिवारी संध्याकाळी एक लाख १० हजार रूपयांची विदेशी दारू एका वाहनातून जप्त केली. या दारू खरेदी, विक्रीच्या पावत्या आणि याविषयी सविस्तर माहिती वाहनातील इसम देऊ शकला नाही. त्यामुळे भरारी पथकाने हे वाहन अधिकच्या चौकशीसाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केले. निवडणूक विभागाचे भरारी पथक कल्याण पूर्वेतील चक्कीनाका भागात शनिवारी संध्याकाळी संशयास्पद वाहनांची तपासणी करत होते. यावेळी या चौकातून एक मोटार वेगाने जात होती. पथकाने ही मोटार अडवली. या मोटारीत बडवायझर कंपनीच्या ३८ इंचाच्या बाटल्यांचे खोके आढळून आले. वाहनातील इसमाकडे पथकाने या विदेशी दारू खरेदी आणि विक्रीच्या पावत्या मागितल्या. त्याची माहिती वाहन चालकासह त्याचा साथीदार देऊ शकला नाही.निवडणूक कामात या विदेशी दारूचा गैरउपयोग होण्याची शक्यता असल्याने पथकाने ही माहिती तातडीने राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुय्यम निरीक्षक आर. डी. आव्हाड यांना दिली. हवालदार वाय. के. गायकवाड, पंच सुनील कशिवले, रोहिदास डोक यांच्या उपस्थितीत या विदेशी दारूसह वाहनाचा पंचनामा करण्यात आला. ही वाहने उत्पादन शुल्क विभाग अधिकाऱ्यांच्या ताब्यात निवडणूक भरारी पथकाने अधिकच्या चौकशीसाठी दिली. ही विदेशी दारू मोटारीतून वहनाचे काम डोंबिवली पश्चिमेतील देवीचापाडा येथील संतोष किट्टना शेट्टी (४०) हे करत होते.



## पाच नंबर साठवण तलावातील पाणी वापर न करता नगरपालिकेने तीन दिवसाआड पाणीपुरवठा कसा सुरू केला..?

### यातील गौंड बंगाल काय ... संजय काळे यांनी उपस्थित केला सवाल

कोपरगाव : पाच नंबर साठवण तलावाचे इनलेट व आऊटलेट चे काम अपूर्ण आहे. तसेच अजूनही पाच नंबर साठवण तलावातील पाणी वापर सुरू केलेला नाही तरी देखील कोपरगाव नगरपालिकेने शहराला तीन दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केलेला आहे. यातील गौड बंगाल काय आहे असा सवाल सामाजिक कार्यकर्ते व विधान सभेसाठी अपक्ष उमेदवारी करत असलेले संजय काळे यांनी उपस्थित केला आहे. कोपरगाव शहरातील नागरिकांना नगरपालिका मागील काही दिवसांपर्यंत आठ दिवसाआड पाणीपुरवठा करत होती. कधी बारा तर कधी एकवीस दिवसातून पाणी मिळत होते अशी देखील परिस्थिती निर्माण झाली होती. इतक्या हाल अपेष्टांना शहरातील जनतेला सामोरे जावे लागले होते. कोपरगाव शहराला मुबलक प्रमाणात पाणीपुरवठा व्हावा शहराची पाण्याची तहान भागावी म्हणून अनेक दिवस शहरातील पाण्यावर राजकारण झाले.अनेकांनी शहरातील पाण्यावर आपल्या राजकीय पोळ्या भाजल्या.एक दोन तीन चार पाच असे पाच साठवण तलावाची निर्मिती झाली. अनेक दिवस गाजावाजा करून पाच नंबर साठवण तलाव हा शहरातील पिण्याच्या पाण्यासाठी तयार करण्यात आला.त्यावरूनही अनेक आरोप प्रत्यारोप झाले. आमदारांनी सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेकांनी गाजावाजा करून पाच नंबर साठवण तलावासाठी भरघोस निधी मंजूर करून घेतला. मोठा गाजावाजा करत पाच नंबर साठवण तलावाचे २० सप्टेंबर रोजी लोकार्पण करण्यात आले. ही जरी जमेची बाजू असली तरी सामाजिक कार्यकर्ते व विद्यमान विधानसभेसाठी अपक्ष उमेदवारी करत असलेले उमेदवार संजय काळे यांनी पाच नंबर साठवण तलावाचे बाबतीत महत्त्वाची माहिती समोर आणली आहे ती अशी की, अजूनही पाच नंबर साठवण तलावाचे इनलेट व आऊटलेट चे काम बाकी आहे. तसेच अजूनही पाच नंबर साठवण तलावातील पाणी वापर सुरू केलेला नाही मात्र आमदारांनी सांगितल्यानंतर कोपरगाव नगरपालिकेने तीन दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केलेला आहे.माजी नगराध्यक्ष मंगेश पाटील यांनी पावसाळा सुरू झाल्यानंतर गोदावरी नदी व कालव्यांना मुबलक पाणी वाहून जात असताना कोपरगाव शहराला तीन दिवसाआड पाणीपुरवठा करावा अशी मागणी केली होती मात्र त्यांच्या मागणीकडे नगरपालिकेने सपशेल दुर्लक्ष केले होते.



मागील महिन्यामध्ये आमदारांनी नगरपालिका मुख्याधिकारी यांच्या समवेत बैठक घेवून सूचना केल्या की तीन दिवसाआड पाणी पुरवठा करा.बैठकीच्या दुसऱ्या दिवसा नंतर नगरपालिकेने तीन दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केला. मात्र यातील मुख्य बाब अशी की लोकार्पण करून जवळपास सव्वा महिना झाला तरी अजूनही पाच नंबर साठवण तलावातील पाणी वापर सुरू केलेला नाही असे असताना देखील नगरपालिकेने तीन दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केला आहे याचा अर्थ पाच नंबर साठवण तलावातील पाणी न वापरता देखील तीन दिवसाआड पाणीपुरवठा होईल एवढा पाणी साठा नगरपालिकेकडे उपलब्ध आहे.म्हणजेच याचा अर्थ केवळ श्रेय घेण्यासाठी म्हणून विद्यमान आमदारांनी पाच नंबर साठवण तलावाच्या उद्घाटनापर्यंत जनतेला वेठीस धरले आणि शहरातील जनतेला तीन दिवस पाणीपुरवठा होण्याइतपत पाणीसाठा नगरपालिकेकडे शिल्लक असताना देखील नगरपालिकेने आमदाराच्या सांगण्यावरून शहरातील जनतेला पाण्यापासून वंचित ठेवले अशी वस्तुस्थिती संजय काळे यांनी समोर आणलेली आहे. समाज माध्यमावर संजय काळे यांनी याचा व्हिडिओ प्रदर्शित केला असून त्याचा मोठा गाजावाजा सुरू आहे. त्यामुळे जनतेला आता खऱ्या अर्थाने वस्तुस्थिती समजणार आहे. या सर्व गोष्टीचा विधानसभा निवडणुकीवर किती प्रभाव पडेल हे पाणी महत्त्वाचे ठरणार आहे.

## अभूतपूर्व शक्तीप्रदर्शन, विक्रमी गर्दी, प्रचंड जल्लोष आणि ढोल ताशांच्या गजरात महाविकास आघाडी कडून दिपकआबांचा उमेदवारी अर्ज दाखल

### सांगोला तालुक्यातील सर्व रस्त्यावर ट्राफिक जाम ; राजकीय इतिहासातील रेकॉर्डब्रेक गर्दी

**सांगोला ; तालुका प्रतिनिधी**

संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या सांगोला विधानसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्ह्याचे नेते माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी सांगोला तालुक्याच्या राजकीय इतिहासातील ऐतिहासिक आणि अभूतपूर्व आणि रेकॉर्डब्रेक शक्तीप्रदर्शन करून महाविकास आघाडीकडून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. दिपकआबा साळुंखे पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सुमारे ३० ते ३५ हजार दिपकआबा प्रेमी शिवसैनिकांनी सांगोला शहरात गर्दी केली होती. संपूर्ण विधानसभा मतदारसंघातून वाहनांचे लोंढेच्या लोंढे शहरात दाखल झाल्याने





संपूर्ण सांगोला विधानसभा मतदारसंघातील रस्त्यावर ट्राफिक जाम झाल्याचे चित्र सोमवारी दिवसभर पाहायला मिळाले. प्रचंड जल्लोष ढोल ताशांचा कडकडाट आणि उत्साहात महात्मा फुले चौक येथून माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांची उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी रॅली सुरू झाली. विशेष म्हणजे रॅलीतील सर्वात पुढे असणारे लोक सांगोला तहसील कार्यालयात पोहोचले तरीही रॅलीमध्ये सहभागी असणारे लोक अजूनही महात्मा फुले चौकातच होते. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार आणि काँग्रेस यांसह मित्र पक्षाच्या वतीने महाविकास आघाडी कडून सोमवार दि २८ रोजी दिपकआबांनी आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी बहीरप्पा माळी यांच्याकडे दाखल केला यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संभाजीराजे शिंदे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्राध्यापक प्रबुद्धचंद्र झपके घेरडी गावचे माजी सरपंच धनगर समाजाचे युवा नेते बिरा पुकळे आणि शिवसेना महिला आघाडीच्या सुरेखा सलगर आदी उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर जयभवानी चौक येथे या रॅलीचे जाहीर सभेत रुपांतर झाले यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख साईनाथ अभंगराव, संभाजीराजे शिंदे, प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, शिवाजीराव बनकर, अभिषेक कांबळे, संभाजी हरिहर, तुषार इंगळे, अक्षय चोरमुले, अजित देवकते, संतोष पाटील, नवनाथ मोरे, अनिल नवत्रे, सखुबाई वाघमारे आदींसह महाविकास आघाडीतील घटक पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी बोलताना सांगोला तालुक्याच्या सर्वांगीण आणि सर्वसमावेशक विकासासाठी २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीत माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील या वारकरी सांप्रदायाचा आणि निस्सीम निस्वार्थी सेवेचा वारसा लाभलेल्या उमेदवाराला विजयी करून राज्यातील सत्ताधाऱ्यांना हद्दपार करण्याचे उपस्थितांना आवाहन केले.

### १) शेवटच्या श्वासापर्यंत विश्वासाला तडा जाऊ देणार नाही

यंदाची विधानसभा निवडणूक सांगोला विधानसभा मतदारसंघातील जनतेनेच हातात घेतली आहे. महाविकास आघाडीकडून मला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने उमेदवारी दिली आहे. मी हाती मशाल घेतल्यापासून दररोज माझ्याकडे नवीन लोंढे शिवसेना परिवारात दाखल होत आहेत. फक्त एका हाकेवर ८ ते १० हजार महिला आणि हजारोंच्या संख्येने माझ्यावर आणि शिवसेनेवर तसेच महाविकास आघाडीवर प्रेम करणाऱ्या ३० ते ३५ हजार कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली. आजवर केलेल्या प्रामाणिक कामाची हीच खरी पोहोच पावती म्हणावी लागेल. सांगोलकरांचे प्रेम आणि विश्वास पाहून खरोखर मी भारावून गेलो आहे. माझ्याकडे वारकरी संप्रदायाचा वारसा आणि सेवेचा वसा आहे. सांगोलकरांच्या प्रेमाला आणि विश्वासाला शेवटच्या श्वासापर्यंत तडा जाऊ देणार नाही.

; दिपकआबा साळुंखे पाटील उमेदवार, महाविकास आघाडी २५३ सांगोला विधानसभा मतदारसंघ

२) काँग्रेस पाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेसचाही दिपकआबांना बिनशर्त पाठिंबा..! सांगोला विधानसभा मतदारसंघातील काँग्रेस पक्षाच्या महत्त्वपूर्ण पदाधिकाऱ्यांनी नुकतीच बैठक घेऊन सर्वानुमते महाविकास आघाडीचे उमेदवार दिपकआबा साळुंखे पाटील यांना पाठिंबा जाहीर केला होता. काँग्रेस पाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तालुकाध्यक्ष डॉ. धनंजय पवार यांनीही जाहीर सभेतून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचा दिपकआबांना पाठिंबा जाहीर केला. आबांना पाठिंबा देण्याचा निर्णय आपण राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांना विश्वासात घेऊनच घेतला असल्याचेही डॉ. धनंजय पवार यांनी जाहीर केले.

Printed By, Published By, on behalf of: **Ismail Salim Shaikh,** Printed at Meher Creative Graphics, Chistiya Colony, N-5, Cidco, Tq. & Dist. Aurangabad 431003 (Maharashtra) and published from **Zunjar janta** gulshan nagar, Sillod, Tq. Sillod, Dist. Aurangabad - 431112 (Maharashtra), Editor - **Ismail Salim Shaikh,** Mob:- **8180068180** E-mail: zunjarjanta@gmail.com **RNI NO. MAHMAR/2022/82590**

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक **इस्माईल सलीम शेख** यांनी मेहेर क्रिएटिव्ह ग्राफिक्स चिश्तिया कॉलोनी -५ सिडको औरंगाबाद - ४३१००१ (महाराष्ट्र) येथे छापून, **झुंजार जनता**, कार्यालय गुलशन नगर सिल्लोड ता. सिल्लोड जिल्हा औरंगाबाद -४३१११२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - **इस्माईल सलीम शेख** संपर्क ८१८००६८१८० E-mail: zunjarjanta@gmail.com **RNI NO. MAHMAR/2022/82590**